# सौ लीना निरंजन सोहोनी : परिचय

सौ लीना निरंजन सोहोनी या सुप्रसिद्ध लेखिका व अनुवादिका असून मेहता पब्लिशिंग हाऊससाठी त्यांनी अनुवादित केलेल्या प्रकाशित व अप्रकाशित पुस्तकांची संख्या सुमारे ५५ आहे. या शिवाय वृत्तपत्रांमधून आणि नियतकालिकांमधून त्या मराठी तसेच इंग्रजीमधून नियमित लेखन करतात. लीना सोहोनी यांनी इ.स. १९८१ मध्ये पुणे विद्यापीठातून जर्मन विषयात एम् ए ही पदवी संपादन केली. त्यावेळी कलाशाखेत सर्वप्रथम आल्याबदद्ल त्यांना विद्यापीठाकडून **चॅन्सेलर्स गोल्ड मेडल** प्राप्त झाले. लीना सोहोनी यांना आजवरच्या त्यांच्या अनुवादित साहित्याबद्दल महाराष्ट्र शासनातर्फे देण्यात येणारा **राज्यपुरस्कार दोन वेळा** प्राप्त झाला असून त्यांना त्यांच्या साहित्यक्षेत्रातील भरीव कामगिरीबद्दल जी. ए. कुलकर्णी पुरस्कार, न. चिं. केळकर पुरस्कार,, बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार असे अनेक पुरस्कार प्राप्त झाले. जर्मन विषयाच्या अध्यापन प्रशिक्षणासाठी जर्मनीमध्ये जाण्याची त्यांना दोन वेळा संधी मिळाली. त्यासाठी त्यांना जर्मनीच्या सांस्कृतिक मंत्रालयातर्फे एकदा तसेच मॅक्स म्युलर भवन मुंबईतर्फे एकदा शिष्यवृत्ती प्राप्त झाली होती.

त्यांना अनुवाद कार्यशाळा तसेच व्यक्तिमत्वविकास कार्यशाळांमध्ये प्रशिक्षक म्हणून काम करण्याचा विपुल अनुभव आहे.